# नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर

नामप्रविप्रा, स्टेशन रोड, सदर, नागपूर – ४४०००१.
फोन नं. २५३३२०२, पी.बी.एक्स.नं. २५३१४३१, २५३१४३२, फॅक्स नं. ०७१२ २५३१४३१

क्रमांक : साप्रवि/आ.वि./नामप्रविप्रा/ /कार्य.समि.ति.सभा/ दिनांक :

विषय :— नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या गुरूवार दिनांक १५/११/२०१८ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता मिळणेबाबत.

महोदय,

गुरूवार दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८ रोजी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची बैठक मा. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त तयार करण्यात आले असून, सोबत जोडलेले बैठकीचे इतिवृत्त सविनय मान्यतेस सादर.

अपर जिल्हाधिकारी
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

प्रस्तावित केल्याप्रमाणे मान्यतेस्तव

मा. महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सविनय सादर.

1.12.18

Each page initialled.

मा. अपर ~~मुख्य सचिव~~ (गृह)

5/12

# नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

## कार्यकारी समितीच्या सभेची विषयसुची व झालेले निर्णय

### तिसरी बैठक

| अनु. क्र. | विषय | प्रस्ताव | झालेले निर्णय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या व्दितीय बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे व दिनांक ६ फेब्रुवारी २०१८ चे निर्णयाचा अनुपालन अहवाल. | महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम २०१६ नियम क्र. ४ अन्वये महानगर प्राधिकरणाची रचना करण्यात आली आहे. सदर अधिनियमातील नियम क्र. ७ प्रमाणे महानगर प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०६ फेब्रुवारी २०१८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत झालेल्या निर्णयांचा अनुपालन अहवालास मंजुरी प्रदान करणे प्रस्तावित आहे. | मंजूरी प्रदान केली | १ |
| २ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २६.०३.२०१८ रोजी संपन्न झालेल्या व्दितीय बैठकीतील निर्णय, इतिवृत्त तथा सुचनांचा अनुपालन अहवाल. | — | नोंद घेतली | २ |
| ३ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २०.०८.२०१८ रोजी संपन्न झालेल्या तृतीय बैठकीतील ठराव अवलोकनार्थ सादर. | — | नोंद घेतली | ३ |
| ४ | नागपूर येथे १००० क्षमतेच्या नवीन शासकीय मागासवर्गीय मुलांच्या वसतीगृहाचे इमारत बांधकाम (विद्युतीकरण वगळून) कामाच्या निविदा स्विकृतीबाबत | मे. विजय कंन्स्ट्रक्शन कंपनी यांची नागपूर येथे १००० क्षमतेच्या नवीन शासकीय मागासवर्गीय मुलांच्या वसतीगृहाचे इमारत बांधकाम (विद्युतीकरण वगळून) करणे या कामाची रू. २८,७६,११,२०५.६९ किंमतीची निम्नतम निविदा मंजूर करण्याबाबत निर्णय घेण्यास्तव सादर. | निम्नतम दराच्या निविदेला मंजूरी प्रदान केली | ४–५ |
| ५ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण जमिन विल्हेवाट विनियमाचे (Land Disposal Regulation) प्रारूप प्रस्ताव मान्यतेस्तव सादर. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण जमिन विल्हेवाट विनियमाचे (Land Disposal Regulation) प्रारूप शासनास मंजूरीस्तव पाठविण्याचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर. | पुढील बैठकीत ठेवण्यात यावे असे ठरविले | ६ |
| ६ | <u>प्रस्तावित नगर रचना योजना</u> मौजा – गोंडखैरी – चिचभुवन – पेंढरी (Draft Town Planning Scheme) क्षेत्र २०.३० चौ. कि.मी. या नगर रचना योजनेकरीता, १) महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना व अधिनियम १९६६ चे कलम ६० (१) अन्वये इरादा घोषित करणे | वरील संपुर्ण बाबींवर विचार करून सदर प्रकरण तातडीचे असल्याने नव्याने तयार करण्यात आलेल्या मौजा – गोंडखैरी – चिचभुवन – पेंढरी (Draft Town Planning Scheme) अंदाजे क्षेत्र २०.३० चौ. कि.मी. या नगर रचना योजनेकरीता, १) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ६० (१) अन्वये इरादा घोषित करणे | मंजूरी प्रदान केली | ७ ते ९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | २) योजनेचे प्रभावि अमलबजावणीकरीता उक्त अधिनियमांचे कलम – ५९ ते ६८ अंतर्गत प्राधिकरणानी करावयाच्या कार्यवाही करीता महानगर आयुक्त, नामप्रविप्रा यांना अधिकार प्रदान करणे.<br>३) नगर रचना योजनेवर लागणारा आवश्यक निधि खर्च करण्यास मा. आयुक्त, नामप्रविप्रा, नागपूर यांना वित्तीय अधिकार प्रदान करण्याबाबत | २) योजनेचे प्रभावि अमलबजावणीकरीता उक्त अधिनियमांचे कलम – ५९ ते ६८ अंतर्गत प्राधिकरणानी करावयाची कार्यवाही करीता मा. महानगर आयुक्त, नामप्रविप्रा यांना अधिकार प्रदान करणे.<br>३) नगर रचना योजनेवर लागणारा आवश्यक निधि खर्च करण्यास मा. आयुक्त, नामप्रविप्रा, नागपूर यांना वित्तीय अधिकार प्रदान करणे | | |
| ७ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अधिकार क्षेत्रातील प्रस्तावित इमारत बांधकाम नकाशे मंजुर करतांना आकारण्यात येणारे शुल्क जर रू. १.०० कोटी पेक्षा जास्त असेल तर अशा प्रकरणात किस्तीने (Instalment) शुल्क घेवून नामप्रविप्रा चे हक्क अबाधित ठेवून बांधकाम परवानगी देण्याबाबत. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अधिकार क्षेत्रातील प्रस्तावित इमारत बांधकाम नकाशे मंजुर करतांना आकारण्यात येणारे शुल्क जर रू. १.०० कोटी पेक्षा जास्त असेल तर अशा प्रकरणात, किस्तीने (Instalment) शुल्क घेवून नामप्रविप्रा चे हक्क अबाधित ठेवून बांधकाम परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव कार्यकारी समितीसमोर मंजुरी करीता सादर आहे. | मंजूरी प्रदान केली | १०–११ |
| ८ | नागपूर महानगर प्रदेश विकास निधी (बँक खात्याचे व्यवहार) प्रारूप विनियम, २०१८ महाराष्ट्र शासनाच्या मान्यते करिता सादर करणे बाबत | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (बँक खात्याचे व्यवहार) प्रारूप विनियम, २०१८ महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेकरिता पाठविण्याबाबत दिनांक २०.०८.२०१८ रोजी प्राधिकरणाच्या सभेत तत्वतः मान्यता प्रदान करण्यात आली व प्राप्त निर्देशानुसार सदर विनियम शासनाकडे मंजूरीस्तव सादर करणेकरिता कार्यकारी समितीच्या मान्यतेकरिता ठेवण्यात येत आहे. | पुढील बैठकीत ठेवण्यात यावे असे ठरविले | १२–१३ |
| ९ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (वित्तीय) प्रारूप विनियम, २०१८ महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेकरिता पाठविण्याबाबत | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (वित्तीय) प्रारूप विनियम, २०१८ महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेकरिता पाठविण्याबाबत दिनांक २०.०८.२०१८ रोजी प्राधिकरणाच्या सभेत तत्वतः मान्यता प्रदान करण्यात आली व प्राप्त निर्देशानुसार सदर विनियम शासनाकडे मंजूरीस्तव सादर करणेकरिता कार्यकारी समितीच्या मान्यतेकरिता ठेवण्यात येत आहे. | पुढील बैठकीत ठेवण्यात यावे असे ठरविले | १४ ते १९ |
| १० | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (बैठकीचे कामकाज चालविणे) प्रारूप विनियम, २०१८ बाबत. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (बैठकीचे कामकाज चालविणे) विनियम, २०१८ प्राधिकरणाच्या मान्यतेकरिता पाठविण्याबाबत कार्यकारी समितीची मान्यता मिळण्यास विनंती आहे. | पुढील बैठकीत ठेवण्यात यावे असे ठरविले | २०–२१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे नियम/विनियम शासनाव्दारे मंजूर होवून निर्गमीत होई पर्यन्त, नागपूर सुधार प्रन्यासचे प्रचलित लेखा विषयक नियमानूसार यथास्थिती कार्यवाही करण्यास मंजूरी मिळण्याबाबत. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे नियम/विनियम शासनाव्दारे मंजूर होवून निर्गमीत होई पर्यन्त, नागपूर सुधार प्रन्यासचे प्रचलित लेखा विषयक नियमानूसार यथास्थिती सुरू असलेल्या कार्यवाही करण्यात येत असलेल्या कार्यपध्दतीस मंजूरी मिळण्याचे प्रस्तावित आहे. | मंजूरी प्रदान केली | २२ |
| १२ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांचे कार्यालयीन कामकाज व निविदा प्रक्रिया करिता स्वतंत्र सर्व्हर कक्ष, संगणक सामुग्री, आज्ञावली व सल्लागार संस्था स्पर्धा तत्वावर घेण्यास मंजुरी मिळण्याबाबत. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांचे कार्यालयीन कामकाज व निविदा प्रक्रिया करिता स्वतंत्र सर्व्हर कक्ष, संगणक सामुग्री, आज्ञावली व सल्लागार संस्था स्पर्धा तत्वावर घेण्यास मंजुरी मिळण्याबाबत विनंती आहे. | महानगर आयुक्त, नामप्रविप्रा यानी त्यांना प्रदान केलेल्या अधिकारात मंजूरी द्यावी. | २३ |
| १३ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सदस्यांना भत्ते) प्रारूप विनियम, २०१८ कार्यकारी समितीची मान्यतेकरीता पाठविण्याबाबत. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सदस्यांची भत्ते) प्रारूप विनियम, २०१८ प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर करण्यास कार्यकारी समितीची मान्यता मिळण्यास विनंती आहे | पुढील बैठकीत ठेवण्यात यावे असे ठरविले | २४–२५ |
| १४ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (समित्यांच्या बैठकीचे कामकाज चालविणे) विनियम, २०१८ बाबत. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (समित्यांच्या बैठकीचे कामकाज चालविणे) प्रारूप विनियम, २०१८ प्राधिकरणाच्या मान्यतेकरिता सादर करण्यास कार्यकारी समितीची मान्यता मिळण्यास विनंती आहे | पुढील बैठकीत ठेवण्यात यावे असे ठरविले | २६–२७ |
| १५ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामधील शासनाने मंजूर केलेल्या सुधार योजना–२ येथील सुमठाणा गावाजवळील मिहान सिमेपासून आऊटर रिंगरोड पर्यतच्या उत्तर–दक्षिण २४.० मी. रूंद क्रॉंकीट रस्ता तयारण्यासाठी पूर्वलक्षी प्रभावाने मंजुरी मिळण्याबाबत. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामधील शासनाने मंजूर केलेल्या सुधार योजना–२ येथील सुमठाणा गावाजवळील मिहान सिमेपासून आऊटर रिंगरोड पर्यतच्या उत्तर–दक्षिण २४.० मी. रूंद क्रॉंकीट रस्ता तयारण्यासाठी पूर्वलक्षी प्रभावाने मंजुरी मिळण्याचे प्रस्तावित आहे. | मंजूरी प्रदान केली | २८ |
| १६ | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे क्षेत्रासाठी प्रारुप विकास योजनेत प्रस्तावित रहिवासी–३ आणि रहिवासी–४ या विभागात विकास परवानगी प्रदान करतांना पायाभूत सुविधेकरीता मुलभूत सुविधा निधी (Infrastructure Cost) रू. ५०.०० लक्ष पेक्षा जास्त असेल तर अशा प्रकरणात किस्तीने (Instalment) रक्कम घेवून नामप्रविप्रा चे हक्क अबाधित ठेवून विकास परवानगी देण्याबाबत. | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे क्षेत्रासाठी प्रारुप विकास योजनेत प्रस्तावित रहिवासी–३ आणि रहिवासी–४ या विभागात विकास परवानगी प्रदान करतांना पायाभूत सुविधेकरीता मुलभूत सुविधा निधी (Infrastructure Cost) रू. ५०.०० लक्ष पेक्षा जास्त असेल तर अशा प्रकरणात किस्तीने (Instalment) रक्कम घेवून नामप्रविप्रा चे हक्क अबाधित ठेवून विकास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव कार्यकारी समितीसमोर मंजुरी करीता सादर आहे | मंजूरी प्रदान केली | २९–३० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | अद्यावत सर्व समावेशक गतीशीलता आराखडा (Updated Comprehensive Mobility Plan) शासनास सादर करण्याकरीता संम्मती / मान्यता देणेबाबत | अद्यावत सर्व समावेशक गतीशीलता आराखडा ( Updated Comprehensive Mobility Plan) शासनास सादर करण्याकरीता संम्मती / मान्यता देण्याचे प्रस्तावित आहे. | मंजूरी प्रदान केली | ३१–३२ |
| १८ | नागपूर महानगर क्षेत्राअंतर्गत खडका – किरमीटी – शिवमडका – सुमठाणा – पांजरी व सुमठाणा– कोतेवाडा– जामठा– परसोडी या दोन सुधार योजनेअंतर्गत प्रस्तावित मुख्य जलवाहिकाचे कामाकरीता निविदा राशी रू. २२.४९ कोटी लक्ष ला प्राधिकरणाची दिनांक २०.०८.२०१८ च्या सभेत मंजुरी प्रदान होऊन निविदा मंजूर झाल्याबाबत. | नागपूर महानगर क्षेत्राअंतर्गत खडका– किरमीटी– शिवमडका– सुमठाणा– पांजरी व सुमठाणा– कोतेवाडा– जामठा– परसोडी या दोन सुधार योजने अंतर्गत प्रस्तावित मुख्य जलवाहिकाचे कामाकरीता निविदा राशी रू. २२.४९ कोटी लक्ष ला प्राधिकरणाची दि. २०.०८.२०१८ च्या सभेत मंजुरी प्रदान होऊन निविदा मंजूर झाल्याबाबतचा विषय कार्यकारी समितीच्या माहितीकरिता सादर | नोंद घेतली | ३३ |

# नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

ठराव क्र. १/०३/१५.११.२०१८:

विषय :– बुधवार दिनांक ६ फेब्रुवारी २०१८ रोजी संपन्न झालेल्या नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या व्दितीय बैठकीतील निर्णय, इतिवृत्त व अनुपालन अहवाल कार्यकारी समितीसमोर माहिती व अनुमोदनाकरिता ठेवण्याबाबत.

**ठराव** :– महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम २०१६ नियम क्र. ४ अन्वये महानगर प्राधिकरणाची रचना करण्यात आली आहे. सदर अधिनियमातील नियम क्र. ७ प्रमाणे महानगर प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०६ फेब्रुवारी २०१८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत झालेल्या निर्णयांचे इतिवृत्त तथा अनुपालन अहवाल मंजूर करण्यात आला.

\\192.168.1.115\D\SANDIP\Gajbhiye Sir

ठराव क्र. २/०३/१५.११.२०१८:

विषय :– नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २६.०३.२०१८ रोजी संपन्न झालेल्या व्दितीय बैठकीतील निर्णय, इतिवृत्त तथा सुचनांचा अनुपालन अहवाल.

ठराव : उपरोक्त विषयाला कार्यकारी समितीनी एकूण १६ ठरावाबाबत तसेच मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, नामप्रविप्रा यानी दिलेले निर्देशानुसार नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने केलेल्या कार्यवाही बाबतचे अहवालाची नोंद घेतली.

\\192.168.1.115\D\SANDIP\Gajbhiye Sir

ठराव क्र. ३/०३/१५.११.२०१८:

विषय :— नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २०.०८.२०१८ रोजी संपन्न झालेल्या तृतीय बैठकीतील ठराव अवलोकनार्थ सादर.

ठराव : उपरोक्त विषया प्रमाणे एकूण १० ठरावा बाबत कार्यकारी समितीने नोंद घेतली.

ठराव क्रमांक. : ४/०३/१५.११.२०१८

**विषय :–** **नागपूर येथे १००० क्षमतेच्या नवीन शासकीय मागासवर्गीय मुलांच्या वसतीगृहाचे इमारत बांधकाम (विद्युतीकरण वगळून) कामाच्या निविदा मंजूरीबाबत.**

शासन निर्णय क्र. बीसीएच–२०१३/प्र.क्र.३६/बांधकामे दिनांक ३१.०३.२०१६ व सुधारीत शासन निर्णय क्र. बीसीएच–२०१३/प्र.क्र.३६/बांधकामे दिनांक ०३.०२.२०१८ अन्वये नागपूर येथे १००० क्षमतेच्या नवीन शासकीय मागासवर्गीय मुलांच्या वसतीगृहाचे इमारत बांधकाम करण्याकरीता रू. ५८४२.४६ लक्ष च्या कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर कामाकरीता समाजिक न्याय व विशेष सहाय्य महाराष्ट्र शासन यांनी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास रू. ५८४२.४६ लक्ष उपलब्ध करून दिलेले आहे.

सदर कामाच्या (विद्युतीकरण वगळून) रू. ४६,९३,८७,८८३/– अंदाजपत्रकास अधिक्षक अभियंता (प्रकल्प), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांनी क्र. ३२०/Govt Grant Social Justice/EE(Project) /2017-18 दिनांक ०३.०५.२०१८ अन्वये तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर कामाच्या रू. ३३,४२,०७,५९५/– निविदा बी–२ नमुन्यात सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय दिनांक १२.०४.२०१७ नुसार दिनांक १५.०५.२०१८ रोजी मागविण्यात आली. (निविदा सुचना क्र.०६/२०१८–१९). सदर निविदा www-mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली. तसेच, वृत्तपत्रात जाहिरातीव्दारे प्रसिध्द करण्यात आली होती. या कामाच्या निविदा सुचना क्र. ०६/२०१८–१९ मध्ये नऊ निविदा प्राप्त झाल्या व प्राप्त निविदाचा लिफाफा–१ (तांत्रिक) दिनांक २५.०६.२०१८ रोजी संकेत स्थळावरून डॉउनलोड करण्यात आल्या व निविदेचे तांत्रिक दस्ताऐवजाची छाननी अंती खालील कंत्राटदाराच्या आठ निविदा तांत्रिक तपासणी मध्ये पात्र ठरल्या.

१. मे. विजय कंन्स्ट्रक्शन, नागपूर
२. मे. स्पेक्ट्रम इन्फ्रास्ट्रक्चर, नागपूर
३. मे. सादीक ॲन्ड कंपनी, नागपूर.
४. मे. आदित्य कंन्स्ट्रक्शन कंपनी, नागपूर
५. मे. इंदु कंन्स्ट्रक्शन, अमरावती.
६. मे. डी. व्ही. पटेल ॲन्ड कंपनी, , नागपूर
७. मे. सीएमएम इन्फ्रास्ट्रक्चर, नागपूर
८. मे. बी. एल. मेहता, कंन्स्ट्रक्शन, नागपूर

दिनांक ०४.०८.२०१८ रोजी वरील आठ कंत्राटदारांनी सादर केलेली लिफाफा–२ (फायनांशिअल बिड) डाउनलोड करण्यात आली. निविदा धारकांनी सादर केलेल्या निविदेची एकूण रक्कम खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंपनी | प्राप्त निविदेची एकूण रक्कम रू. |
|---|---|---|
| १. | मे. विजय कंन्स्ट्रक्शन, नागपूर | २८,७६,११,२०५.६९ (L-1) |
| २. | मे. स्पेक्ट्रम इन्फ्रास्ट्रक्चर, नागपूर | २८,८६,२८,९२९.७२ (L-2) |
| ३. | मे. सादीक ॲन्ड कंपनी, नागपूर. | २८,९२,३५,३९८.२२ (L-3) |

| | | |
|---|---|---|
| ४. | मे. आदित्य कंन्स्ट्रक्शन कंपनी, नागपूर | २९,१९,३०,३३८.०० (L-4) |
| ५. | मे. इंदु कंन्स्ट्रक्शन, अमरावती. | २९,६८,५०,३६८.५३ (L-5) |
| ६. | मे. डी. व्ही. पटेल ॲन्ड कंपनी, , नागपूर | ३०,०६,५१,४६४.४१ (L-6) |
| ७. | मे. सीएमएम इन्फ्रास्ट्रक्चर, नागपूर | ३०,५५,६२,१६७.७९ (L-7) |
| ८. | मे. बी. एल. मेहता, कंन्स्ट्रक्शन, नागपूर | ३१,६८,००,९४१.०१ (L-8) |

वरील विवरणानुसार मे. विजय कंन्स्ट्रक्शन, नागपूर यांनी सादर केलेली निविदा रक्कम रू २८,७६,११,२०५.६९ (१३.९४ टक्के कमी दराने) निम्नतम देकार आहे. हा देकार १३.९४ टक्के कमी दराचा असल्याने निविदा धारकाने निविदेच्या अटी व शर्ती नुसार निविदा रक्कमेवर रू. १,६७,१५,०००.०० (५.०० टक्के, आवश्यक ४.९४ टक्के) किंमतीची मुदत ठेव परफारमंस सिक्युरीटी म्हणुन सादर केलेली आहे.

सदर प्राप्त निविदेची रक्कम रू. २८,७६,११,२०५.६९ आहे. व नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यकारी समिती बैठक दिनांक २६.०३.२०१८ ठराव क्र १३/०२/दिनांक २६.०३.२०१८ च्या ठरावानुसार निविदां स्विकृती बाबतचे अंतिम अधिकार सन २०१७ च्या अधिनियमा मधील कलम ७(३) (तीन) नुसार कार्यकारी समितीला आहेत.

ठराव : **मे. विजय कंन्स्ट्रक्शन कंपनी यांची नागपूर येथे १००० क्षमतेच्या नवीन शासकीय मागासवर्गीय मुलांच्या वसतीगृहाचे इमारत बांधकाम (विद्युतीकरण वगळून) करणे या कामाची रू. २८,७६,११,२०५.६९ निविदे रकमेपेक्षा १३.९४ टक्के कमी दरावर किंमतीची निम्नतम निविदा मंजूर करण्यात आली.**

**ठराव क्रमांक :– ५/०३/१५.११.२०१८**

विषय :– नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण जमिन विल्हेवाट विनियमाचे (Land Disposal Regulation) प्रारूप प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे जमिन विल्हेवाट विनियम पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे जमीन विल्हेवाट विनियमाच्या आधारे तयार करण्यात आलेले आहे. तसेच नागपूर सुधार प्रन्यास जमिन विल्हेवाट अधिनियम १९८३ चा संदर्भ देखील पाहण्यात आलेला आहे, सदर्हू बाबतीत नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासाठी तयार केलेले जमिन विल्हेवाट विनियम २०१८ ची प्रत सोबत सलग्न केलेली आहे. यामध्ये प्रामुख्याने अधिकच्या सूचवीलेल्या बाबी समाविष्ट करून अधोरेखीत केलेल्या आहेत. सदर विषयानुषंगाने नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २०/०८/२०१८ रोजी झालेल्या सभेत नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे जमिन विल्हेवाट विनियम धोरण १५ दिवसांत तयार करण्यात येऊन राज्य शासनाकडे मान्यतेसाठी सादर करावे असे ठराव क्र. ०५ अन्वये प्राधिकरणाचे निर्देश आहेत.

कार्यकारी समितीच्या मान्यतेने सदर्हू विनियम शासनास मंजूरी करीता सादर करण्यात येईल.

ठराव :– **नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण जमिन विल्हेवाट विनियमाचे (Land Disposal Regulation) प्रारूप मान्यतेसाठी कार्यकारी समितीच्या पुढील बैठकीत ठेवण्यात यावे असे ठरविले.**

\\192.168.1.115\D\SANDIP\Gajbhiye Sir

ठराव क्रमांक:– ६/०३/१५.११.२०१८

विषय :– प्रस्तावित नगर रचना योजना

मौजा–गोंडखैरी–चिचभुवन–पेंढरी (Draft Town Planning Scheme) क्षेत्र २०.३० चौ. कि.मी. या नगर रचना योजनेकरीता,

१) महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना व अधिनियम १९६६ चे कलम ६० (१) अन्वये इरादा घोषित करणे

२) योजनेचे प्रभावि अमलबजावणीकरीता उक्त अधिनियमांचे कलम – ५९ ते ६८ अंतर्गत प्राधिकरणानी करावयाच्या कार्यवाही करीता महानगर आयुक्त, नामप्रविप्रा यांना अधिकार प्रदान करणे.

३) नगर रचना योजनेवर लागणारा आवश्यक निधि खर्च करण्यास मा. आयुक्त, नामप्रविप्रा, नागपूर यांना वित्तीय अधिकार प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासनाने दि.०६/०५/२००० रोजी अधिसुचना क्र. टिपीएस /२४९८/१५०९/प्र. क्र. /२७३/९३/नवि–९ अन्वये 'प्रादेशिक योजना नागपूर' मंजुर केलेली असुन सदर योजना दि. १५/०६/२००० पासुन अमलात आलेली आहे.

शासनाने अधिसुचना क्र. टिपीएस /१८९९/११९१/प्र. क्र.८०–९९/नवि–१३ दि. २३/०७/१९९९ अन्वये **'नागपूर महानगर क्षेत्र'** घोषित केलेले आहे व अधिसुचना क्र. टिपीएस /२४०९/२८९०/प्र. क्र.३५६/०९/नवि–९ दि.३१/०८/२०१० अन्वये नागपूर सुधार प्रन्यासला नागपूर महानगर क्षेत्राच्या विकासाकरीता 'विशेष नियोजन प्राधिकरण' म्हणुन नियुक्त केले.

शासनाने अधिसुचना क्र. टिपीएस /२४१३/४५१/प्र. क्र.२३१/नवि–९, दि. २४/१२/२०१४ अन्वये म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ च्या कलम ४२ अन्वये नागपूर महानगर क्षेत्र **'विकास क्षेत्र'** म्हणुन घोषित करून कलम ४२ घ अन्वये उक्त विकास क्षेत्रासाठी नागपूर सुधार प्रन्यासला **'क्षेत्र विकास प्राधिकरण'** म्हणुन नियुक्त केले.

नागपूर सुधार प्रन्यासच्या विश्वस्त मंडळाने ठराव क्र. १२ / १११६ /२.२.१३/अ.अ./ना.स.त. दि. २/२/२०१३ अन्वये नागपूर महानगर क्षेत्रामधील मौजा गोंडखैरी –चिचभूवन– पेढरी मधील २०.३० चौ. कि.मी. जागेवर जनता सहयोग तत्वावर वाणिज्य प्रयोजनाकरीता (Logistic) सुधार योजना राबविण्याकरीता मंजुरी प्रदान केली . उक्त सुधार योजनेच्या नियोजनाच्या कामाकरीता मे. हॅल्क्रो कंपनी या सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे. सुधार योजनेत समाविष्ट जागांचे निरीक्षण, सर्वेक्षण, मोजमापे, लेव्हल घेणे, आखणी करणे व सर्वेक्षणाकरीता अन्य आवश्यक कामे करण्याकरीता ना.सु.प्र. अधिनियत – १९३६ च्या कलम ५४ व ५५ अन्वये दि. २०/०१/२०१६ रोजीच्या स्थानिक दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली. सुधार योजनेच्या अनुषंगाने ना.सु.प्र. अधिनियम –१९३६ च्या कलम ३९ अन्वयेची अधिसुचना प्रसिध्द झाली नाही.

शासनाने महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अध्यादेश, २०१६ ( सन २०१७ च्या महा. ३) च्या कलम ३ च्या उपकलम (१) नुसार नागपूर महानगर प्रदेशासाठी 'नागपूर महानगर प्रदेश विकास

प्राधिरकण' स्थापन करण्याची अधिसुचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ०४/०३/२०१७ रोजी प्रसिध्द केली आहे आणि या अधिसुचनेव्दारे **'विकास क्षेत्र'** म्हणुन घोषित करून कलम ४२ घ नुसार या घोषित क्षेत्रासाठी नागपूर सुधार प्रन्यासला 'क्षेत्र विकास प्राधिकरण' म्हणुन नियुक्त केले आहे. शासनाची दि. २३/१२/२०१४ ची अधिसुचना क्र. टिपीएस /२४१३/४५१/प्र. क्र.२३१/नवि–९, विखंडित केलेली आहे.

नागपूर महानगर प्रदेशासाठी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण स्थापन झाले असल्याने व महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम २०१६ च्या कलम ७ (३) (दोन) अन्वये प्राप्त अधिकारान्वये कार्यकारी समिती प्राधिकरणाच्या प्रकल्पांच्या आणि परीयोजनाच्या मंजुरी किंवा नामंजुरीसह अशा प्रकल्पांचे किंवा परीयोजनांचे नियोजन आणि कार्यान्वयन करण्याचे कर्तव्य पार पाडु शकेल.

शासन निर्णय क्र. ना.सु.प्र. २०१६ / प्र. क्र. १३४/ नवि–२६, दि. ९/०२/२०१७ अन्वये शासनाने नागपूर सुधार प्रन्यास अधिनियम १९३६ च्या कलम १२१ मधील तरतुदीनुसार नागपूर सुधार प्रन्यास , नागपूर ही स्वायत्त संस्था बरखास्त करण्याबाबत दि.२७/१२/२०१६ च्या मा. मंत्रीमंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयाचा विचार करता गौडंखैरी – चिचभुवन–पेढरी ही प्रस्तावित सुधार योजना ना.सु.प्र. अधिनियमान्वये पुढे चालु ठेवल्यास कायदेशिर अडचणी उपस्थित होण्याची शक्यता असल्याने नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सभेने ठराव क्र. ३/०१ दि. ०७.०६.२०१७ व ४/०१ दि. ०७.०६.२०१७ अन्वये खालील निर्णय घेतला.

' नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची कार्यकारी समितीने वरील बाबीवर विचार केला आणि गौडंखैरी –चिचभुवन–पेढरी या जागेवरील नागपूर सुधार प्रन्यास अधिनियमान्वये प्रस्तावित असलेली सुधार योजना रद्द करून त्या ऐवजी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ५९ ते ११२ अन्वये 'नगर रचना परीयोजना' राबविण्यात व उक्त अधिनियमाच्या कलम ६० (१) अन्वये नगर रचना योजना राबविण्याच्या इरादा घोषित करण्यास मान्यता प्रदान केली . तसेच या योजनेचे नियोजन करण्याकरीता मे. हॅल्क्रो कंपनी या सल्लागाराचे सेवा पुढे चालु ठेवण्यास मंजुरी दिली.'

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सभेने ठराव क्र. ३/०१ दि. ०७.०६.२०१७ व ४/०१ दि. ०७.०६.२०१७ रोजी पारीत केलेल्या ठरावानुसार या कार्यालयाने दि. १९.०१.२०१८ रोजी म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ६० (२) अन्वये शासन राजपत्रात व दि. १९.०१.२०१८ रोजी दैनिक वृत्तपत्रात उक्त क्षेत्रातील पुढील दोन स्वंतत्र योजना प्रसिध्द केल्या.

- मौजा गोंडखैरी, तह. कळमेश्वर व मौजा पेंढरी तह. हिंगणा क्षेत्र ३७१.४१ हे. आर.(भाग– २)
- मौजा गोंडखैरी, तह. कळमेश्वर हिंगणा क्षेत्र ४०६.४५ हे. आर. (भाग – ३)

या कार्यालयाने सदर योजनेस म. प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ६० (३) अन्वये सहसंचालक नगररचना, नागपूर विभाग, नागपूर यांना दि. ०९.१०.२०१८ च्या पत्रान्वये ३ महीन्याची मुदत वाढ देण्याबाबत विंनती केली आहे. प्रत्यक्षात मौजा–गोंडखैरी–चिचभुवन–पेंढरी येथे अंदाजे क्षेत्र २०.३० चौ. कि.मी. जागेवर एकुण ६ टप्यात विभागणी करून टप्या टप्याने योजना राबविणे नियोजनाच्या व उक्त क्षेत्रात सेवा सुविधा पुरविण्याचे दृष्टीने योग्य राहणार नाही. याकरीता संपुर्ण तिन्ही गावांचे क्षेत्राचा एकत्रितपणे विचार करून नागपूर महानगर क्षेत्रातील प्राधिकरणाला प्राप्त होणाऱ्या ४० टक्के जमिनीचा वापर योजनेतील मोकळी जागा, सार्वजनिक सोई सुविधा, परवडणारी घरे, नदीसंवर्धन, रस्ते, निवासी व वाणिज्य इत्यादी उपयोगासाठी करण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे पायाभुत सुविधा जसे सांडपाणी वाहुन नेणाऱ्या नाल्या, रस्त्याचे जाळे, एस. टी.पी. इत्यादी बाबींवर विचार करून सलग एकत्रित आराखडा तयार करणे योग्य राहील. या करीता खालील मुदयावर कार्यवाही होणे आवश्यक आहे.

१) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ६० (१) अन्वये इरादा घोषित करणे

२) योजनेचे प्रभावि अमलबजावणीकरीता उक्त अधिनियमांचे कलम – ५९ ते ६८ अंतर्गत प्राधिकरणानी करावयाची कार्यवाही करीता मा. महानगर आयुक्त, नामप्रविप्रा यांना अधिकार प्रदान करणे.

३) नगर रचना योजनेवर लागणारा आवश्यक निधि खर्च करण्यास मा. आयुक्त, नामप्रविप्रा, नागपूर यांना वित्तीय अधिकार प्रदान करणे.

सबब वरील विषय नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यकारी समितीच्या मंजुरीकरीता व निर्णयार्थ सादर.

ठराव :–

वरील संपुर्ण बाबींवर विचार करून मौजा–गोंडखैरी–चिचभुवन–पेंढरी **(Draft Town Planning Scheme)** अंदाजे क्षेत्र २०.३० चौ. कि.मी. या प्रस्तावित नगर रचना योजनेकरीता इरादा घोषित करण्यास मंजुरी प्रदान करण्याचे त्याच प्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम – ५९ ते ६८ अंतर्गत प्रारूप नगर रचना योजना मंजुरी पर्यन्त शासनास असलेले अधीकार वगळुन नियोजन प्राधिकरणाचे सर्व अधिकार व त्याकरीता लागणारा आवश्यक निधी खर्च करण्यास महानगर आयुक्त, ना.म.प्र.वि.प्रा., नागपूर यांना प्रदान करण्याचे ठरले.

\\192.168.1.115\D\SANDIP\Gajbhiye Sir

ठराव क्रमांक : ७/०३/१५.११.२०१८

विषय: **नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अधिकार क्षेत्रातील प्रस्तावित इमारत बांधकाम नकाशे मंजुर करतांना आकारण्यात येणारे शुल्क जर रू. १.०० कोटी पेक्षा जास्त असेल तर अशा प्रकरणात किस्तीने (Instalment) शुल्क घेवून नामप्रविप्रा चे हक्क अबाधित ठेवून बांधकाम परवानगी देण्याबाबत.**

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात असलेल्या भुखंड/जागेवर प्रस्तावित इमारत बांधकाम करण्यासाठी नागपूर महानगर क्षेत्राकरीता मंजुर झालेल्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली अनुसार परवानगी देण्यात येते. संबंधीत भुखंड/ जागा मालकाकडून त्यांचा भुखंड/ जागेवर बांधकाम करण्यासाठी प्रस्ताव नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे सादर करतात. नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून असे प्रस्ताव विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली नुसार असल्याची खात्री झाल्यानंतर, संबंधितांस बांधकाम परवानगीपोटी आकारण्यात येणाऱ्या सर्व शुल्काबाबतचे मागणीपत्र देण्यात येते. या मागणी पत्राची मुदत एक महिन्याची असते. परंतु संबंधितांने वाढीव मुदत मागितल्यास वाढीव मुदत देण्यात येते. नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे आकारणी केलेली संपूर्ण रक्कम जमा केल्यानंतरच, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून संबंधित भुखंड/ जागा मालकास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत तरतुद क्रमांक ४५ प्रमाणे बांधकाम परवानगी (C.C) देण्यात येते.

अध्यक्ष क्रेडाई नागपूर मेट्रो यांनी दिनांक ०९/१०/२०१८ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेले आहे की, बांधकाम साहित्यामध्ये वाढ झाली आहे. त्याचप्रमाणे रेरा कायदा लागू झाल्यापासून बाजाराची स्थितीमध्ये बदल झालेला आहे व रेरा कायदयाप्रमाणे सदनिका वा दुकान विकत घेणाऱ्या ग्राहकाकडून जोपर्यंत ॲग्रीमेंट होत नाही तोपर्यंत सदनिका विकाणारा १० टक्के पेक्षा जास्त रक्कम घेवू शकत नाही. त्यामुळे विकासकाची आर्थिक स्थिती कोलमडली आहे. त्याचप्रमाणे आर्थिक स्थितीमुळे, प्रधानमंत्री घरकुल योजनेमध्ये बांधण्यात आलेल्या सदनिकाचे काम सुध्दा संथ गतीने होत आहे. अशाप्रकारे, रियल इस्टेटच्या बाजारामध्ये मंदी आलेली आहे. तेव्हा अशा परिस्थितीत, नागपूर शहरातील विकास कामाच्या गतीस पूरक अशी व्यवस्था होणे अत्यावश्यक आहे. या करीता नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्य क्षेत्रातील प्रस्तावित इमारत बांधकाम नकाशे मंजुर करतांना आकारण्यात येणारे शुल्क जर रू. १.०० कोटी पेक्षा जास्त असेल तर अशा प्रकारणात किस्तीने (Instalment) शुल्क घेवून बांधकाम परवानगी देण्याबाबत विनंती केली आहे.

नागपूर महानगर क्षेत्रातील प्रस्तावित इमारत बांधकामासाठी परवानगी देतांना आकारणी करावयाचे शुल्क उदा. जमिन विकास निधी (Land Development Fund), इमारत बांधकाम निधी (Building Construction Charges), प्रव्याजी (Premium) सुरक्षा ठेव (Security Deposit) मध्ये किस्त (Instalment) पाडून शुल्क स्विकारण्याचा प्रस्ताव खालील प्रमाणे आहे.

१) एकूण देय राशीच्या २५ टक्के किंवा बांधकाम कामगार कल्याण उपकर, जमिन विकास निधी (Land Development Fund), इमारत बांधकाम निधी (BCC) हेरिटेज फंड मिळून, यापैकी जी रक्कम